## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिसेंस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)


**महाविद्यालय विकास विभाग**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा फुले शैक्षणिक परिसर, नागपूर-४४००१०

e-mail ID: infoarcollege@ymail.com


क्रमांक : म.वि.वि./ प्रथम संलग्निकरण/228 दिनांक : 07.07.2026.

प्रति ,

प्राचार्य,

के.डी.के. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,

नंदनवन, नागपुर

**विषय :- सत्र २०२६-२७ पासुन अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. मान्यता-२०२६ /प्र.क्र.५३८ /ई-१७०७५३८ /तांशि-४ , दिनांक ०२ जुलै २०२६.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाकित पत्रानुसार राज्य शासनाने आपल्या महाविद्यालयाला सत्र २०२६-२७ पासून खालील नमुद अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार मा.कुलगुरुंनी विद्या परिषदेच्या वतीने गठीत केलेल्या स्थानिय चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार मा.कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत विद्या परिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे नमुद अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ सत्र २०२६-२७ पासून सुरु करण्यास प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

**महाविद्यालयाचे नांव : के.डी.के. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नंदनवन, नागपुर**

| | | |
|---|---|---|
| प्रवेश क्षमता वाढ | **विद्याशाखा:** विज्ञान व तंत्रज्ञान | **माध्यम:** [इंग्रजी] |
| | **अभ्यासक्रम:** बी.टेक.इन सिव्हील इंजिनिअरीग-Regular Shift | **विद्यार्थी प्रवेश क्षमता:** ६० वरुन ९० |
| | **स्तर :** निम्न पदवीधर | **विषय:** As Per Syllabus |

| | | |
|---|---|---|
| प्रवेश क्षमता वाढ | **विद्याशाखा**: विज्ञान व तंत्रज्ञान | **माध्यम**: [इंग्रजी] |
| | **अभ्यासक्रम**: बी.टेक.इन ईलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलीकॉम्युनिकेशन इंजिनिअरींग-Regular Shift | **विद्यार्थी प्रवेश क्षमता**: ९० वरुन १२० |
| | **स्तर** : निम्न पदवीधर | **विषय**: As Per Syllabus |
| प्रवेश क्षमता वाढ | **विद्याशाखा**: विज्ञान व तंत्रज्ञान | **माध्यम**: [इंग्रजी] |
| | **अभ्यासक्रम**: एम.सी.ए. - Regular Shift | **विद्यार्थी प्रवेश क्षमता**: १२० वरुन २४० |
| | **स्तर** : पदव्यूतर | **विषय**: As Per Syllabus |

**<u>प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे</u>**

१. उपरोक्त नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढीस देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रुटी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.

२. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमूद केलेले संपूर्ण अटीचे पालन संस्थेने/महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

३. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशि-३,दिनांक १९ जुन,१९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील त्याचे उलंघन झाल्यास शासन निर्णय दि.२२.१.२००७ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात यईल. तसेच विद्यापीठ निर्देश क्र. ८/२०१६ मधील तरतुदीनुसार कमीत-कमी प्रवेशाची अट पूर्ण करण्याचे अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

४. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

५. नवीन विद्याशाखा मंजुर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्ष झालेली नाहीत त्यांची ५ वर्ष पुर्ण होताच एक वर्षात NAAC अॅक्रेडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

६. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलले प्रवेश रद्द होतील.

७. उपरोक्त नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढ कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागिय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे

८. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील वर्षाकरीता निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयानी पुढील

सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

९. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.

१०. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस/महाविद्यालय नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकड्यांना आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने/महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे.

११. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/संस्थेची राहील याची नोंद घ्यावी (लागू असल्यास).

१२. महाविद्यालयातील सदर नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढीस पूढील वर्षासाठी निरंतर संलग्निकरणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र दि. ३१ ऑगस्ट पूर्वी **www.rtmnu.net** या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

कृपया कळावे.

(डॉ.राजेंद्र उतखेडे)
उपकुलसचिव

प्रतिलिपी माहितीकरिता सादर :-

१. मा.संचालक (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण), शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पूणे - ४११००१
२. मा. प्र-कुलगुरू
३. मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर - ४४०००१
४ मा.वित्त व लेखा अधिकारी.
५. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
६. उपकुलसचिव विद्या विभाग.

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

७. सहायक कुलसचिव, सामान्य परीक्षा विभाग, गोपनिय विभाग, व्यावसयिक परीक्षा, परीक्षा व चौकशी.
८. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता.
९. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी

(डॉ.राजेंद्र उतखेडे)
उपकुलसचिव